**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

जा.क्र.अम / सका - ०४ / २०१९.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : ०९ / ०९ /२०१९.

अहमदनगर महानगरपालिकेच्या विशेष सभेची सुचना

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (ड) अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०४, शुक्रवार दिनांक १३ / ०९ /२०१९.**

प्रति,
मा.श्री. / श्रीमती............................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

महोदय,

यांस.-

याद्वारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र. १ ( ड ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची विशेष सभा **शुक्रवार दिनांक १३ /०९/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता अहमदनगर महानगरपालिकेचे नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** येथे सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्याची विनंती करण्यांत येत आहे.

**सोबत :** १. विषय पत्रिका
२. प्रस्तावाची टिप्पणी.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

सभा क्रमांक - ४ शुक्रवार दिनांक १३ / ०९ / २०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता **अहमदनगर महानगरपालिकेचे नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** येथे होणा-या **विशेष सभेची विषय पत्रिका.**

| विषय क्र. | विषय |
|---|---|
| २० | अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रत्येक महिन्याच्या सर्वसाधारण सभेमध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत या योजने बाबत अंमलबजावणीची माहिती देणे. |
| २१ | अहमदनगर महानगरपालिकेमधिल कायम पात्र कर्मचा-यांना / अधिकारी यांना दिवाळी सणानिमित्त सानुग्रह अनुदानाबाबत |
| २२ | चाहुराणा बु. येथील स.नं.१०७/५/६ मंजुर एन.ए. ले आउट पैकी प्लॉट नं. १ ते ५ यावर चुकीने टाकलेले आरक्षण उठविण्याबाबत |
| २३ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर साो, यांचे मान्यतेने.
दिनांक : ०९ / ०९ /२०१९.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- २०** **दिनांक : १३ / ०९ /२०१९.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रत्येक महिन्याच्या सर्वसाधारण सभेमध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत या योजने बाबत अंमलबजावणीची माहिती देणे**...**

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :-**

स्वच्छ महाराष्ट्र अभियानाअंतर्गत ODF,IHHL, प्लास्टिक वेस्ट मॅनेजमेंट नियम-२०१६ च्या पुर्ततेचा अहवाल.

- स्वच्छ महाराष्ट्र अभियाना अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण - २०२० कक्ष निर्माण करण्यात आले आहे. सदर कामी नोडल ऑफीसर तसेच स्वच्छ सर्वेक्षण कक्ष प्रमुखाची नेमणुक करण्यात आली आहे.
- स्वच्छ सर्वेक्षण २०२० स्थानिक स्वराज्य संस्थासाठी मार्गदर्शन सुचनेनुसार शहरातील हॉटंल, व्यावसायीक क्षेत्र, शाळा, कॉलेज, इतर बाबीची माहिती घेण्यात येवून मार्गदर्शक सुचनेनुसार घनकच-याचे जागेवर विल्हेवाट लावणेकामी कार्यवाही चालू आहे.
- तसेच या अंतर्गत हॉटेल, शाळा, शासकीय कार्यालय, हॉस्पीटल, मार्केट संघटना, गृहनिर्माण संस्था, इ. घटकांमध्ये "स्वच्छ स्पर्धा" घेण्यात आली आहे. तसेच या संस्थेचे पहिल्या तिमाहीचे मुल्यांकनाचे काम चालू आहे.
- स्वच्छ सर्वेक्षण - २०१८ च्या पाहणीनुसार अहमदनगर महानगरपालिकेस मिळालेल्या गुनांकणानुसार ५०० शहरातुन मिळणारे क्रमांक १४१ आहे. तसेच २०१९ च्या पाहणीनुसार मिळणारा क्रमांक २७३ आहे.
- या अभियानात मनपाने भाग घेवून २ STAR रेटींगचे प्रमाणपत्र मिळाले आहे. तसेच शहर ओडीएफ म्हणुन शासनामार्फत घोषीत करण्यात आलेले आहे. व त्याबाबत आपल्या महानगरपालिकेस ओडिएफ प्रमाणपत्र मिळालेले आहे.
- शहरा थ्री - थ्री स्टार मानांकन करणेकामी मा.महासभेची मंजुरी घेण्यात आली आहे. त्या दृष्टीकोनातुन कार्यवाही चालू आहे. तसेच ओडीएफ + दर्जा मिळणेकामी मा.महासभेची मंजूरी बाकी आहे.
- वैयक्तिक शौचालय करीता प्रति लाभार्थी एकुण १७,०००/- रु.(शासनामार्फत प्राप्त निधीतुन रक्कम रु.१२,०००/- व मनपा मार्फत रक्कम रु.५,०००/- देण्यात येत आहे.)
- वैयक्तिक शौचालय करीता एकुण ४००७ अर्ज प्राप्त झालेले आहे.
- एकुण २४१७ लाभार्थीच्या अर्जाना मान्यता प्राप्त झाली आहे.
- एकुण २४१७ मंजुर प्रकरणापैकी २४०३ लाभार्थींनी वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम पुर्ण केलेले आहे.
- उर्वरित एकुण ६ लाभार्थींचे वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम प्रगती पथावर आहे.

- एकुण सार्वजनिक शौचालय संख्या १३ ठिकाणे (२०८ सीट्स.)
- एकुण सामुदायीक शौचालय संख्या - १९ ठिकाणे (२४८ सीट्स.)

---*---

**चर्चा :-**

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** स्वच्छ सर्व्हेक्षण २०१८ च्या पाहणीनुसार अहमदनगर महानगरपालिकेस मिळालेल्या गुणांकनानुसार ५०० शहरातुन मिळणारे क्रमांकामध्ये महानगरपालिकेचा १४१ आहे. तसेच २०१९ च्या पाहणीनुसार मिळणारा क्रमांक २७३ आहे. सन २०२० च्या स्वच्छ सर्व्हेक्षणासाठी महानगरपालिकेने काय काय तयारी केली आहे. वैयक्तीक शौचालय किती बांधले त्याची माहिती द्या.

**मा.महापौर साहेब :-** ठळक मुद्यांबाबत माहिती द्यावी.

**श्री.सुरेश भालसिंग, सिटी को-ऑडर्नेटर :-** स्वच्छ सर्व्हेक्षण २०१८ च्या पाहणीनुसार अहमदनगर महानगरपालिकेस मिळालेल्या गुणांकनानुसार ५०० शहरातुन मिळणारे क्रमांकामध्ये महानगरपालिकेचा १४१ आहे. तसेच २०१९ च्या पाहणीनुसार मिळणारा क्रमांक २७३ आहे. या अभियानात महानगरपालिकेने भाग धेवुन २ STAR रेटींगचे प्रमाणपत्र मिळविले आहे. तसेच शहर ओडीएफ म्हणुन शासनामार्फत घोषित करण्यांत आले आहे. व त्याबाबत आपल्या महानगरपालिकेस ओडीएफ प्रमाणपत्र मिळालेले आहे. तिमाही मा.शासनाची टीम आढावा घेण्याकरीता येणार आहे. १०० टक्के उद्यीष्ट्य पुर्ण होत नाही तोपर्यंत ओडीएफ + दर्जा मिळणार नाही. शहरातील एकुण ३२ सार्वजनिक शौचालय दुरुस्त करावी लागणार आहेत.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** सन २०१९ च्या पाहणीनुसार मिळणारा क्रमांक २७३ आला आहे. तो मानांकन ४१ च्या आत येण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यांत यावेत. नविन वाहने घेण्यांत यावीत. सार्वजनिक शौचालय दुरूस्त करण्यासाठी १४वा वित्त आयोगाचा निधी वापरण्यात यावे.

**मा.महापौर साहेब :-** सन २०१९ च्या पाहणीनुसार मिळणारा क्रमांक २७३ आला आहे. तो मानांकन ४१ च्या आत येण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. सार्वजनिक शौचालय दुरूस्त करण्यासाठी १४वा वित्त आयोगाचा निधीतून तरतूद करणेत यावी. जेणेकरुन महानगरपालिकेस ओडीएफ + दर्जा मिळण्यास अडचण होणार नाही.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** ज्या जुन्या गाडया आहेत त्यांचा लिलाव करण्यांत यावा. जेणेकरुन त्या ठिकाणी नविन वाहने लावण्यास जागा होईल.

**मा.महापौर साहेब :-** लवकरात लवकर जुन्या वाहनांचा लिलाव करण्यांत यावा.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** शहर भर कचरा झालेला आहे. २ ऑक्टोंबर २०१९ पासुन आय लव्ह नगर यांचे वतीने स्वच्छता विषयक स्पर्धा घेण्यांत येणार आहे. त्यास महानगरपालिकेने सहकार्य करावे. शहरात चांगला उपक्रम होईल. आरोग्य विभागाने सहकार्य करण्याची भुमिका घ्यावी.

**मा.महापौर साहेब :-** लवकरात लवकर कार्यवाही करावी. आपल्या शहराचा स्वच्छ सर्व्हेक्षण २०२० अंतर्गत होणा-या मानांकनात क्रमांक ५० च्या आत कसा येईल यादृष्टीने प्रयत्न करावेत.मंजूर डिपीआर तपशीलानुसार नविन वाहने खरेदी करणेत यावी.

---*---

**ठराव :-**

शासन निर्णय क्रमांक सवमअ-२०१९/प्र.क्र.८२/नवि-३४ दिनांक २४ मे, २०१९ च्या शासन निर्णयान्वये तसेच शासनाच्या निर्देशानुसार महानगरपालिकेकडून स्वच्छ भारत अभियान / स्वच्छ सर्वेक्षण मोहिम राबविण्यांत येत आहे. यापुर्वी स्वच्छ सर्वेक्षण २०१८ च्या पाहणीनुसार अहमदनगर महानगरपालिकेस मिळालेल्या गुनांकणानुसार ५०० शहरातुन मिळणारे क्रमांक १४१ आहे. तसेच २०१९ च्या पाहणीनुसार मिळणारा क्रमांक २७३ आहे. आता स्वच्छ सर्वेक्षण २०२० चे काम सुरु असुन, शासन निर्देशानुसार या कामाची अंमलबजावणी तसेच घनकचरा व्यवस्थापन नियमांचे पालन करणे गरजेचे आहे. तसेच स्वच्छ सर्वेक्षण २०२० मध्ये देखिल आपल्या शहराचे मानांकन वाढविण्याच्या दृष्टीने कृती आराखडयातील निर्दिष्ठ बाबींची पुर्तता करणे तसेच शहराचा मागील वर्षी मिळविलेला ODF दर्जा टिकविणे व त्यापुढील ODF + दर्जा प्राप्त करुन घेण्यासाठी पुढील वाटचाल व कार्यवाही करणे तसेच कचरा मुक्त शहरांच्या तारांकित मानांकनामध्ये अहमदनगर महानगरपालिकेस ३ स्टार मानांकन प्राप्त करुन घेणे आवश्यक असल्याने, प्रस्तावित केल्यानुसार स्वच्छ सर्वेक्षण २०२० अंतर्गत अहमदनगर महानगरपालिकेस ३ स्टार मानांकन व ODF + दर्जा प्राप्त करुन घेण्यासाठी महानगरपालिकेचे सामुदायिक शौचालय दुरुस्ती करणे आवश्यक आहे. १४ व्या वित्त आयोगाच्या अनुदानातुन सामुदायिक शौचालय दुरुस्ती करीता रक्कम रुपये १२ लाख ची तरतुद करण्यांत यावी. याबाबत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करणेस व कृती कार्यक्रम राबविण्यास ही सभा मान्यता देण्यांत येत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागा करिता मा.शासनाने स्वच्छ भारत अंतर्गत सविस्तर प्रकल्प अहवाल मंजुर केला आहे. यामध्ये कचरा संकलन व वाहतुकी करीता मंजुर डिपीआर नुसार Four wheeler tipper GEM portal व्दारे खरेदी करण्यात यावे यामध्ये मंजुर डिपीआर मधील तपशीलानुसार BID तयार करुन ती पोर्टलवर प्रसिध्द करण्यात यावी व वाहन खरेदी करावी. याबाबत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी व यापुर्वीचा महासभा प्रस्ताव क्रमांक ०५ दिनांक १६/०७/२०१९ रोजीचा ठराव रद्द करण्यांत येत आहे. यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.रविंद्र रावसाहेब बारस्कर

अनुमोदक :- मा.श्री.मनोज शंकर कोतकर

ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- २१** **दिनांक : १३ / ०९ /२०१९.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेमधिल कायम पात्र कर्मचा-यांना / अधिकारी यांना दिवाळी सणानिमित्त सानुग्रह अनुदानाबाबत

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**संदर्भः-**

१) अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांचेकडील जा. क्र. २८ / श्रमिक / २०१९ दिनांक १९/०७/२०१९ रोजीची संप नोटीस.

२) जा.क्र.आस्था. १४६९ दिनांक २६/०७/२०१९ अन्वयेचे पत्र.

३) मा. सहा. कामगार आयुक्त, अहमदनगर यांचेकडील जा.क्र. ACL/IDA/PUS/1068/2019 दि. 29/07/2019 चे पत्र.

४) दिनांक २२/०८/२०१९ रोजी मनपा प्रशासन व कामगार युनियन यांचेमधील संयुक्त बैठक.

५) दिनांक २६/०८/२०१९ रोजी मनपा प्रशासन व कामगार युनियन यांचेमधील संयुक्त बैठक.

६) अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांचेकडील दि. २७/०८/२०१९ रोजीचे धरणे आंदोलना बाबतचे पत्र.

७) मनपा प्रशासन व कामगार युनियन यांचेमधील दि. ३० / ०८ / २०१९ रोजी झालेल्या संयुक्त बैठकीमधील निर्णय.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये की, मा. कॉ. अनंत दत्तात्रय लोखंडे, अध्यक्ष, अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांनी त्यांचेकडील जा. क्र. २८ / श्रमिक / २०१९ दिनांक १९ / ०७ / २०१९ अन्वये औद्योगिक विवाद अधिनियम १९४७ च्या कलम २२ (१) नुसार संप नोटीस देऊन परिशिष्टातील मागण्यासाठी अहमदनगर महानगरपालिकेतील सर्व कामगार दिनांक ०६/०८/२०१९ पासुन किंवा त्यानंतर संपावर जातील असे नमुद करुन संप नोटीसमध्ये सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये खालील प्रमाणे मागण्या केलेल्या आहेत.

**१) दि. २७/१०/२०१९ रोजी दिवाळी सण असल्याने महानगरपालिकेतील सर्व कामगारांना सन २०१८ - १९ या सालासाठी त्यांच्या सर्व भत्यासह होणा-या वार्षिक मिळकतीच्या २०% बोनस म्हणुन दिवाळी सणापुर्वी अदा करण्यात यावा.**

**२) महानगरपालिकेतील सर्व कामगारांना दिवाळी सणासाठी सानुग्रह अनुदानापोटी रक्कम रु. २०,०००/- (अक्षरी रु.वीस हजार मात्र) दिवाळीपुर्वी विनाअट देण्यात यावी.**

त्यानुषंगाने जा. क्र. आस्था. १४६९ दि. २६/०७/२०१९ अन्वये महानगरपालिका कामगार युनियन यांना पत्र देवुन कामगारांचे दिवाळी सानुग्रह अनुदान विषयी मनपा प्रशासन व कामगार युनियन प्रतिनिधी यांचेमध्ये संयुक्त बैठक आयोजित करणेबाबत कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत असल्याने दि. ०६/०८/२०१९ रोजी किंवा त्यानंतर संपावर जावु नये याबाबत नमुद करुन सुचित केलेले होते.

दरम्यानकाळात मा. सहा. कामगार आयुक्त, अहमदनगर यांचेकडील जा.क्र. ACL/IDA/PUS/ 1068/ 2019 दि. 29/07/2019 अन्वये पत्र देवुन कामगार युनियन यांचे संप नोटीसाच्या अनुषंगाने दिनांक २१/०८/२०१९ रोजी मा. सहा. कामगार आयुक्त, अहमदनगर यांचे कार्यालयात सुनावणी होवुन दि. ०४/०९/२०१९ रोजी पुनश्चः सुनावणी तारीख ठेवण्यात आलेली होती. सदर सुनावणी वेळेस मनपा प्रशासन कामगार युनियन यांचे

संयुक्त बैठक आयोजित करण्यात येईल असे म्हणणे माडण्यांत आलेले असुन पुढील सुनावणी ०४/०९/२०१९ रोजी दु. ३: ०० वाजता ठेवण्यात आलेली आहे.

अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांचेकडील जा. क्र. २८ / श्रमिक / २०१९ दिनांक १९ / ०७ / २०१९ अन्वयेच्या संप नोटीस व दिनांक २७/०८/२०१९ रोजीचे धरणे आंदोलनाबाबतचे पत्राच्या अनुषंगाने दिनांक ३०/०८/२०१९ रोजी मनपा प्रशासन व कामगार युनियन यांचेमध्ये संयुक्त बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर संयुक्त बैठकीमध्ये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

"दिवाळी सणापुर्वी महानगरपालिका कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान घेणेबाबत अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २०१९-२० चे अंदाजपत्रकामध्ये रु. ९५ लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे. सध्या महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बिकट असुन अनेक शासकीय / निमशासकीय देणे तसेच महानगरपालिका सेवानिवृत्त कर्मचारी व सेवेमधील कर्मचारी यांचेही देणे बाकी आहे. युनियन मागणीच्या अनुषंगाने २०,०००/- सानुग्रह देता येणार नाही. तथापि कामगार युनियन यांनी केलेल्या मागणीचा विचार करता प्रशासनाचे खालील प्रमाणे मत आहे.

दिवाळी अगोदर ५,०००/- व डिसेंबर मध्ये उर्वरित रक्कम २,०००/- अशी एकुण ७,०००/- देवु असे सुचिविले तसेच वसुली व इतर मार्गाने महानगरपालिकेचे उत्पन्न वाढल्यास एकरकमी दिवाळीसाठी सानुग्रह ७,०००/- देता येईल याप्रमाणे सानुग्रह अनुदान अदा करणेबाबत निर्णय घेण्यात येत आहे. त्याप्रमाणे मनपा कामगार युनियन यांनी सदरची मागणी मान्य करावी. सदर प्रशासनाच्या मतास कामगार युनियन यांनीही सहमती दर्शविलेली आहे. तरी दिवाळीपुर्वी रक्कम रु. ५,०००/- व डिसेंबरमध्ये रु. २,०००/- देण्यात यावेत. जर वसुली व इतर मार्गाने उत्पन्न वाढल्यास दिवाळीपुर्वी रक्कम रु. ७,०००/- देण्यात येतील असा निर्णय घेण्यात येत आहे. (**सोबत : बैठकीचे इतिवृत्त**)

मा. सर्वसाधारण सभा ठराव क्रं. ०१ दिनांक २५/०६/२०१९ च्या पारीत ठरावाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २०१९ - २०२० या अंदाजपत्रकामध्ये सानुग्रह अनुदानाकरीता रक्कम ९५ लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीमध्ये अमदनगर महानगरपालिकेमध्ये दि. ०१/०१/२०१९ रोजी अंदाजे १९३० कायम कर्मचारी असुन त्यानुषंगाने प्रत्येकी रु. ७,०००/- या प्रमाणे दिवाळी सणानिमित्त सानुग्रह अनुदान म्हणुन देणेकामी अंदाजे रक्कम रुपये १,३५,१०,०००/- (अक्षरी रु. एक कोटी पत्तीस लाख दहा हजार) इतका खर्च अपेक्षित होईल.

तरी अहमदनगर महानगरपालिका कामगार यांचेकडील जा.क्र. २८ / श्रमीक / २०१९ दिनांक १९/०७/२०१९ अन्वयेची संप नोटीस व दिनांक २७/०८/२०१९ रोजीचे धरणे आंदोलनाबाबतचे पत्राच्या अनुषंगाने दिनांक ३० / ०८ / २०१९ रोजी मनपा प्रशासन व कामगार युनियन यांचेमध्ये झालेल्या संयुक्त बैठकीमधील निर्णयानुसार अहमदनगर महानगरपालिकेमधील कायम पात्र कर्मचा-यांना दिवाळी सणानिमित्त दिवाळीपुर्वी रक्कम रु. ५,०००/- व डिसेंबरमध्ये रु. २,०००/- अशी जर वसुली व इतर मार्गाने उत्पन्न वाढल्यास दिवाळीपुर्वी रक्कम रु. ७,०००/- याप्रमाणे देणे बाबतचा विषय आर्थिक व धोरणात्मक स्वरुपाचा असल्याने सदरच्या प्रस्तावास मंजुरी मिळणे करीता सदरचा विषय मा. आयुक्त साहेब यांचे मान्यतेने मा.महासभेपुढे मंजुरी करीता सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, मुलेअ व मुलेप यांचा अभिप्राय घेण्यात यावा.

यावर मुख्यलेखाधिकारी यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावित अ प्रमाणे मा.महासभेपुढे प्रस्ताव ठेवणेस मान्यतेस्तव सादर. Paging अपूर्ण आहे पूर्तता करावी.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, अ मध्ये प्रस्तावित केल्यानुसार व मुलेप यांच्या अभिप्रायानुसार मा.महासभेपुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :-**

**मा.सौ.सोनाली चितळे :-** मानधनावरील कर्मचा-यांनाही मानधन देण्यांत यावे.

**मा.महापौर साहेब :-** यावेळेस मानधनावरील कर्मचा-यांना पहिल्यांदा सानुग्रह अनुदान देत आहोत. निदान १०००/- रुपये द्यावेत. प्रशासनाने आर्थिक स्थिती पाहुन कार्यवाही करावी.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर अहमदनगर महानगरपालिका मधील कायम पात्र कर्मचा-यांना दिवाळी सणानिमित्त सानुग्रह अनुदान प्रत्येकी रक्कम रु.७,०००/- इतका देण्यांस व सानुग्रह अनुदान बाबतच्या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार दिपावली सणाच्या दृष्टीने महानगरपालिकेत मानधनावर काम करीत असलेले कर्मचारी यांना प्रत्येकी रक्कम रुपये १,०००/- सानुग्रह अनुदान देण्याबाबत योग्य ती कार्यवाही प्रशासनाने करावी. सानुग्रह अनुदान बीले तयार करणे व अदा करणेचे काम संबंधीत विभागाच्या वेतन अदाकर्ता विभागाने करावे. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ.मालन सुरेश ढोणे,

अनुमोदक :- मा.सौ.सोनाली अजय चितळे

ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-<br>
महापौर,<br>
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- २२** **दिनांक : १३ / ०९ /२०१९.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-** चाहुराणा बु. येथील स.नं.१०७/५/६ मंजुर एन.ए. ले आउट पैकी प्लॉट नं. १ ते ५ यावर चुकीने टाकलेले आरक्षण उठविण्याबाबत.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**संदर्भः-** १) शासन निर्णय क्र.टिपीएस-१६९९/१६१२/सीआर-२७(ए) ०३/युडी ९.४ जुलै २००५ रोजीची मंजूर दुसरी सुधारीत विकास योजना.

२) श्री.नामदेवराव चिमाजी ठाणगे व इतर ६ रा.नालेगांव, अ.नगर यांचा दि.४/१०/२०१७ रोजीचा अर्ज.

विनंती रिपोर्ट की, श्री.नामदेवराव चिमाजी ठाणगे व इतर ६ रा.नालेगाव, अ.नगर यांनी संदर्भ क्र.२ नुसार अर्जान्वये चाहुराणा बु.येथील स.नं.१०७/५/६ मंजुर एन.ए.ले आउट पैकी प्लॉट नं.१ ते ५ हे त्यांचे मालकीचे आहेत, सदरील मिळकत ही सन १९८३ मे उपविभागीय अधिकारी अ.नगर भाग यांच्याकडील आदेश क्र.एन.एस.आर/२०/८३ दि.०६/०८/१९८३ अन्वये बिगरशेती मंजुर झालेली आहे. सदर लेआउटला नगररचनाकार अहमदनगर नगरपालिका यांनी ठराव क्र.२४९ दि.१८/०८/१९८४ अन्वये अंतिम स्वरुपाची मंजूरी दिलेली आहे. त्यांचे मालकीचे स.नं.१०७/५/६ या मिळकतीचे एकुण ९ बिगरशेती लेआउट मंजूर झालेली आहे. लेआउट मंजुर करतांना स.नं.१०७/५/६ व स.नं.१०७/३/४ या दोन्ही मिळकती मधुन ६ मिटर रोड दाखविण्यात आलेला असुन त्याप्रमाणे रोड जात आहे. मात्र वरील संदर्भानुसार ४ जुलै २००५ च्या पुर्वीच अर्जदार यांचे मिळकतीस बिगरशेती परवानगी मिळुन लेआउट मंजूर झालेला आहे.

स.नं.१०७/५/६ ही मिळकत सन १९८३ मध्ये बिगरशेती ले-आउट मंजुर झालेली आहे. दरम्यान मौजे चाहु.बु.येथील स.नं.१०७/३/४ या मिळकतीमध्ये शाळेचे व खेळाचे मैदानाचे आरक्षण टाकण्यात आलेले आहे. मात्र सदरचे आरक्षण टाकताना नकाशामध्ये स.नं.१०७/५/६ याचा कोणताही संबंध नसतांना सदर आरक्षण स.नं. १०७/५/६ पैकी प्लॉट नं.१ ते ५ यावर चुकीने दाखविण्यात आलेले आहे. सदरची बाब ही चुकीने झालेली आहे. वास्तविक दोन्ही मिळकती ह्या एकमेकास लागुन असल्यामुळे काहीतरी गैरसमज होउन सदरचे आरक्षण हे चुकीचे पध्दतीने टाकण्यात आल्याचे दिसत आहे. सदरची चुक काहीतरी गैरसमज होउन सदरचे आरक्षण हे चुकीचे पध्दतीने टाकण्यात आल्याचे दिसत आहे. सदरची चुक ही Draftsman Error या सदरात मोडत असुन सदरची चुक दुरुस्त होउन मिळणे अत्यंत जरुरीचे आहे. त्यामुळे स.नं.१०७/५/६ या मिळकतीवर टाकण्यात आलेले आरक्षण उठविण्यात येउन प्लॉट क्र.१ ते ५ हे आरक्षण मुक्त करण्यात येउन सदर मिळकतीवर बांधकामास परवानगी देण्यात यावी अशा बाबत विनंती केलेली आहे.

अर्जदार यांचे उक्त चाहु.बु.स.नं.१०७/५/६ जमिनीवर अ.नगर शहराचे मंजुर दुस-या सुधारीत योजनेमध्ये आरक्षण क्र.९२ प्राथमिक शाळा या सार्वजनिक व निम.सार्वजनिक बाबत वापर दर्शविण्यात आलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांना उक्त जमिनीचा विकास करणे शक्य होत नाही.

उक्त जमिनीबाबत अध्यक्ष मार्कंडेय देवस्थान ट्रस्ट यांनी उक्त विकास योजनेमध्ये स.नं.१०७/५/६ या भुखंडाची आम्हास आवश्यकता नाही. तसेच सदर स.नं.१०७/५/६ या जागेवर दर्शविण्यात आलेले आरक्षण वगळण्यास काही हरकत नाही असे संमतीपत्र दि.२३/०३/२००९ रोजी दिलेले आहे.

उक्त नमुद परिस्थितीचा विचार केला असता, महाराष्ट्र प्रादेशीक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५० नुसार जमिन ज्या लोकहिताच्या प्रयोजनासाठी अंतरीम विकास योजनेमध्ये किंवा विकास योजनेच्या मसुद्यामध्ये किंवा व्यापक विकासाच्या क्षेत्रासंबंधीच्या योजनेमध्ये किंवा अंतिम विकास योजनेमध्ये नेमुन दिलेली असेल किंवा राखुन ठेवलेली असेल किंवा नियम वाटप केलेली असेल त्या प्रयोजनासाठी ती आवश्यक नाही किंवा तिची आवश्यकता राहीलेली नाही (नियोजन प्राधिकरणा व्यतिरिक्त अन्य) समुचीत प्राधिकरणाची खात्री झालेली असेल तर ते (ख) असे नेमुण देणे किंवा आरक्षण किंवा नियम वाटप अंतिम विकास योजनेमधुन वगळण्यास मंजुरी द्यावी. अशी राज्य शासनास विनंती करु शकेल अशाबाबत तरतुद नमुद आहे.

सदर तरतुदीच्या अनुषंगाने तसेच सदर लेआउटला नगररचनाकार अहमदनगर नगरपालिका यांनी ठराव क्रमांक २४९ दिनांक १८/०८/१९८४ अन्वये अंतीम स्वरुपाची मंजुरी दिलेली आहे. त्यांचे मालकीचे स.नं.१०७/५/६ या मिळकतीचे एकुण ९ बिगरशेती प्लॉट पडलेले आहेत. अशाप्रकारे चाहु.बु.स.नं.१०७/५/६ ही मिळकत सन १९८३ साली बिगरशेती लेआउट मंजूर झालेली आहे. लेआउट मंजुर करताना स.नं.१०७/५/६ व स.नं.१०७/३/४ या दोन्ही मिळकती मधुन ६ मीटर रोड दाखविण्यात आलेले असुन त्याप्रमाणे रोड जात आहे. मात्र वरील संदर्भानुसार ४ जुलै २००५ च्या पुर्वीच अर्जदार यांचे मिळकतीस बिगरशेती परवानगी मिळुन लेआउट मंजुर झालेला आहे. व उक्त जमिनीबाबत अध्यक्ष- मार्कंडेय देवस्थान ट्रस्ट यांनी उक्त विकास योजनेमध्ये स.नं.१०७/५/६ या भुखंडाची आम्हास आवश्यकता नाही. तसेच संमतीपत्र दि.२३/०३/२००९ रोजी दिलेले असल्याने उक्त आरक्षण उक्त नमुद परिस्थितीचा विचार केला असता, महाराष्ट्र प्रादेशीक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५० (ख) नुसार वगळणेबाबतचा प्रस्ताव मा.महासभेपुढे निर्णयास्तव सादर करणे योग्य होईल असे मत आहे.

तथापि सदर बाबत मान्यतेस्तव पुढील आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, अ - मान्य

---*---

**चर्चा :-**

विषय क्रमांक २२ चे वाचन करण्यांत आले.

**मा.श्री.सुभाष लोंढे :-** या विषयाबाबत माहिती देण्यांत यावी.

**श्री.जोशी सहा.नगररचनाकार :-** सर्व्हे नंबर १०७/५/६ ही मिळकत सन १९८३ मध्ये बिगर शेती ले आउट मंजूर झालेली आहे. उक्त चाहुराणा बुद्रुक सर्व्हे नंबर १०७/५/६ जमिनीवर अहमदनगर शहराचे मंजूर दुस-या सुधारीत योजने मध्ये आरक्षण क्रमांक ९२ प्राथमिक शाळा आरक्षण टाकण्यांत आले होते. तत्कालीन नगरपालिका असतांना ले-आउट मंजूर केला आहे.

**मा.महापौर साहेब :-** ले आउटला मंजूरी आहे असे असतांना त्यावर आरक्षण टाकले कोणी.

**श्री.वैभव जोशी सहा.नगररचनाकार :-** त्यावेळच्या नगररचनाकार यांनी टाकले आहे. २ ते अडीच गुंठयाचे पाच प्लॉट आहेत.

**मा.श्री.सुभाष लोंढे :-** यात चुकी कोणाची आहे. तेथील प्लॉट धारक हातावरचे पोट असणारे आहेत. त्याठिकाणी बांधकाम झाले आहे. गाळे काढलेले आहेत. महानगरपालिकेने त्यांना एनओसी दिलेली आहे.

**मा.श्री.विनीत पाउलबुधे :-** त्या जागेत हॉस्पीटल झाले आहे. त्या हॉस्पीटलला आरोग्याधिकारी यांनी परवानगी कशी दिली.

**मा.महापौर साहेब :-** आपण सर्व बाबींची शहानिशा करुन पुढच्या सभेत विषय घेवू.

**मा.श्री.विनित पाअुलबुधे :-** या विषयाच्या ऑफिस रिपोर्ट वर सही कोणाची आहे. विषय केंव्हा पाठविण्यांत आला.

**श्री.वैभव जोशी सहा.नगररचनाकार :-** तत्कालीन नगररचनाकार श्री.धोंगडे यांची स्वाक्षरी आहे. नगरसचिव विभागाकडे दिनांक २६/०३/२०१८ रोजी विषय पाठविण्यांत आलेला आहे.

**मा.श्री.विनित पाअुलबुधे :-** ऑफिस रिपोर्ट मध्ये ड्राप्समन एरर असा उल्लेख आहे. त्या बाबत माहिती द्यावी.

**श्री.वैभव जोशी सहा.नगररचनाकार :-** अर्जदार यांनी त्यांचे अर्जात ज्याप्रमाणे उल्लेख केला त्याप्रमाणे टिप्पणीमध्ये घेण्यांत आले आहे.

**मा.श्री.विनित पाअुलबुधे :-** उद्या ते काही म्हणतील. ऑफिस रिपोर्टच चुकीचा आहे. त्याच जागेवर हॉस्पीटल उभारले कसे याची चौकशी करण्यांत यावी. त्याठिकाणी इतर इमारती झाल्या परवानगी नसतांना त्या कशा उभ्या राहील्या.

**मा.महापौर साहेब :-** सर्व बार्बींची तपासणी करायला लावू. सखोल चौकशी करण्यात यावी.

**मा.श्री.सुभाष लोंढे :-** सन १९८३ ला ले आउट मंजूर झालेला आहे. त्यात नागरिकांची काय चूक आहे. त्यावेळेस येणे प्लॉट म्हणुन त्यांनी घेतले आहेत. आज विषय स्थगीत ठेवायचा असेल तर ठेवा. पुढच्या सभेत विषय घ्या.

**मा.श्री.आसिफ सुलतान :-** स्वच्छ सर्व्हेक्षण २०२० चे प्रसिध्दी पत्रक माझेकडे सहीला आले आहे. त्यावरील मजकूर सर्व इंग्रजी मध्ये आहे नगरसेवकांची त्यावर स्वाक्षरी घेण्यांत येत आहे. आम्हाला वाचता येत नाही. कशाचे सर्व्हेक्षण करता.

**मा.महापौर साहेब :-** प्रसिध्दी पत्रकावरचा मजकूर इंग्रजी मध्ये का छपाई करण्यांत आला.

**श्री.भालसिंग, सिटी को-ऑडर्निटर :-** मा.शासनाचा प्रोटोकॉल आहे त्यानुसार छपाई करण्यांत आली आहे. दोन महिन्यानंतर शासनाची स्वच्छ सर्व्हेक्षण अंतर्गत ODD ++ तपासणी साठी टीम येणार आहे. शासनाचे प्रतिनिधी येवून तपासणी करणार आहेत. त्यादृष्टीने शासनास अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

**मा.महापौर साहेब :-** इंग्रजी जे प्रसिध्दी पत्रक दिले आहे ते मराठीमध्ये नगरसेवकांना देण्यांत यावे.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** कुठल्याही सोयी सुविधा नसतांना आमच्या कडून लेखी घेण्यांत येत आहे. आम्ही त्यावर सह्या कशा करणार. आय लव्ह नगर मोहिमेस महानगरपालिकेने सहकार्य करावे.

**मा.श्री.आसिफ सुलतान :-** महानगरपालिकेने कचरा संकलन वाहतुकीचे टेंडर काढले आहे. यामुळे ८ ते १० कोटीचे महानगरपालिकेचे नुकसान होणार आहे. वजनावर टेंडर काढण्यांत आले आहे. मी या बाबतीत मा.आयुक्त यांना भेटुन निवेदन दिले होते. स्थायी समितीत विषय घेण्याची येवढी घाई का करण्यांत आली.

**प्रकल्प अभियंता श्री.मेहेत्रे :-** कचरा संकलन वाहतुकीचे टेंडर वजनावर काढण्यांत आले आहे. इतर महानगरपालिकांची माहिती घेतली. तेथेही वजनावरच टेंडर काढण्यांत आले आहे.

**मा.श्री.आसिफ सुलतान :-** शासन निर्णयानुसार टेंडर काढले आहे का. अटी व शर्ती मध्ये १०० मेट्रीक टनाचा अनुभवाची अट टाकण्यांत आली आहे. परंतु शासन निर्णयानुसार ही अट ५० टक्केच पाहीजे. टेंडरची सद्यस्थिती काय आहे.

**उप अभियंता श्री.मेहेत्रे :-** स्थायी समिती कडून अद्याप ठराव प्राप्त झालेला नाही.

**मा.श्री.आसिफ सुलतान :-** किती वर्षासाठी टेंडर काढण्यांत आले आहे.

**उप अभियंता श्री.मेहेत्रे :-** तीन वर्षासाठी टेंडर काढण्यांत आले आहे. १४ व्या वित्त आयोगामधुन निधी खर्च घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत प्रस्तावित करण्यांत येणार आहे.

**मा.श्री.आसिफ सुलतान :-** एक वर्षासाठी का काढण्यांत आले नाही.

**प्रकल्प अभियंता श्री.मेहेत्रे :-** एक वर्षाकरीता टेंडर काढणे संयुक्तीक नसते.

**मा.महापौर साहेब :-** यांच्या सगळया प्रश्नाचे उत्तर देण्यांत यावे.

---*---

**ठराव :-**

महाराष्ट्र प्रादेशीक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५० (ख) नुसार चाहुराणा बु. येथील स.नं.१०७/५/६ मंजुर एन.ए. ले आउट पैकी प्लॉट नं. १ ते ५ यावर चुकीने टाकलेले आरक्षण उठविण्याबाबतचा प्रस्ताव सविस्तर माहितीसह पुन्हा महासभेपुढे सादर करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

मा.राष्ट्रीय हरीत लवाद, नवि दिल्ली येथे दाखल मुळ याचिका क्रमांक ३४७/२०१६ मध्ये दिनांक ०९/०८/२०१९ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिका स्तरावर जैवविविधता व्यवस्थापन समिती स्थापन करण्यास ही सभा मान्यता देत आहे. प्रशासनाने समिती स्थापन करुन शासन परिपत्रकाप्रमाणे पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

शासन निर्णय क्रमांक स्वमअ-२०१९/प्र.क्र.८२/नवि-३४ दिनांक २४ मे, २०१९ च्या शासन निर्णयान्वये तसेच शासनाच्या निर्देशानुसार महानगरपालिकेकडून स्वच्छ भारत अभियान / स्वच्छ सर्वेक्षण मोहिम राबविण्यांत येत आहे. यापुर्वी स्वच्छ सर्वेक्षण २०१८ च्या पाहणीनुसार अहमदनगर महानगरपालिकेस मिळालेल्या गुनांकणानुसार ५०० शहरातुन मिळणारे क्रमांक १४१ आहे.

तसेच २०१९ च्या पाहणीनुसार मिळणारा क्रमांक २७३ आहे. आता स्वच्छ सर्वेक्षण २०२० चे काम सुरु असुन, शासन निर्देशानुसार या कामाची अंमलबजावणी तसेच घनकचरा व्यवस्थापन नियमांचे पालन करणे गरजेचे आहे. तसेच स्वच्छ सर्वेक्षण २०२० मध्ये देखिल आपल्या शहराचे मानांकन वाढविण्याच्या दृष्टीने कृती आराखडयातील निर्दिष्ठ बाबींची पुर्तता करणे तसेच शहराचा मागील वर्षी मिळविलेला ODF दर्जा टिकविला आहे. व त्यापुढील ODF + दर्जा महानगरपालिकेने सन २०१९ या वर्षी प्राप्त करुन घेतला आहे. व त्यापुढील ODF++ दर्जा प्राप्त करुन घेणे आवश्यक असल्याने, प्रस्तावित केल्यानुसार स्वच्छ सर्वेक्षण २०२० अंतर्गत अहमदनगर महानगरपालिकेस ODF++ दर्जा प्राप्त करुन घेण्यासाठी प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करणेस व कृती कार्यक्रम राबविण्यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.रविंद्र रावसाहेब बारस्कर

अनुमोदक :- मा.श्री.स्वप्नील रोहीदास शिंदे

ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.